# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०९/०६/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०३ कि.मी अंतरावरील मौजा बोथली शिवार बोरी एन.एच.चंद्रपूर नागपूर रोड येथे दिनांक ०८/०६/२०२२ चे १७.०० ते ०९/०६/२०२२ चे ००.३० वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा शंकर हेमराज उमरेडकर (जखमी), वय २९ वर्ष व फिर्यादीचा भाउ आरोपी नामे– मोरेश्वर तुकाराम पराते, वय ४२ वर्ष, रा. लालझेंडा चौक, बांग्लादेश पोलीस चौकाजवळ पाचपावली नागपूर यांच्यात घराच्या हिश्याच्या कारणावरून वाद असुन आरोपीने त्याचे भिसीचे पैसे बुटटीबोरी येथे फसले असल्याचे यातील जखमीला खोटे सांगून ॲक्टीवा मोटरसायकल चालवित बुटटीबोरी ला आणून व स्वता आरोपी मागे बसून येवून बुटटीबोरी वरून नागपूर येथे परत जात असतांना आरोपीने त्याचे जवळील चाकू ने जखमीचे गळयावर वार करून जिवाने मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी नामे– श्रीमती गिता हेमराज उमरेडकर, वय ४७ वर्ष, रा. मु.पो.कोहोडी बाजार चौक कळमेश्वर नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री साखरकर पो.स्टे बोरी मो.क्र ७३५०९०२१०० हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा उपरवाही शिवार येथे दिनांक ०८/०६/२०२२ चे ०४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– सतिश विठठलराव साखरकर वय ३६ वर्ष रा. उपरवाही ता कळमेश्वर जि. नागपूर हे शेतात गेले असता त्यांना गोठयात बांधुन ठेवलेली ०१ गाय व ०१ बैल दिसुन आले नाही. यावरून फिर्यादी हे बाजुचे कास्तकार विशाल गायकवाडला विचारपुस केली असता विशाल गायकवाड यांचा देखील ०१ बैलजोडी दिसत नसल्याचे सांगत होते. फिर्यादीचे ०१ गाय व ०१ बैल किं. २०,०००/– रू. तसेच विशाल गायकवाड यांचे ०१ बैलजोडी किं. ३०,०००/–रू. असे एकुण कि. ५०,०००/–रू. ची जनावरे अज्ञात आरोपीने शेतातील गोठयातील बांधुन ठेवलेले जनावरे पिकअप गाडीमध्ये भरून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार हिवरकर मो. नं ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर